पुण्यनगरी

पुणे, मंगळवार, १९ ऑक्टोबर २०१०

# शुभांगी मुळे यांच्या गायनाने पुणे नवरात्रौ महोत्सवाची सांगता

पुणे, दि. १८ (प्रतिनिधी) - गेले १० दिवस श्री गणेश कला क्रीडा रंगमंच येथे चालू असणाऱ्या पुणे नवरात्र महोत्सवाची सांगता दसऱ्याच्या दिवशी जेष्ठ गायिका शुभांगी मुळे व सहकारी यांच्या गायनाने झाली. शुभांगी मुळे यांनी 'या रावजी बसा भावजी, बुगडी माझी सांडली ग, तुझ्या उसाला लागलं कोल्हा, वाजले की बारा, पोवाडा - मी शिवाजीराजे भोसले, मन उधाण वाऱ्याचे' आदी गाणी व लावण्या सादर केल्या. त्यास प्रेक्षकांनी भरघोस प्रतिसाद दिला. पुणे नवरात्रौ महोत्सवाचे संयोजक अध्यक्ष आबा बागूल यांनी कलावंतांचा सत्कार केला, आणि या महोत्सवास पुणेकरांनी प्रतिसाद दिल्याबद्दल आभार मानले.



पुणे नवरात्रौ महोत्सवात श्री गणेश कला क्रीडा रंगमंच येथे जेष्ठ गायिका शुभांगी मुळे व सहकाऱ्यांचा बहारदार कार्यक्रम झाला.